सहाय्यक संचालक, नगर रचना संवर्गातील अधिकाऱ्यांच्या मध्यावधी बदल्या/प्रतिनियुक्ती बाबत...

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग,
शासन निर्णय बदली - ५८१९/प्र.क्र.९४/नवि-२७,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
चौथा मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १३ ऑगस्ट, २०१९.

प्रस्तावना :-

संचालक, नगररचना व मुल्य निर्धारण विभागाच्या आस्थापनेवरील सहाय्यक संचालक, नगर रचना संवर्गातील अधिकाऱ्यांच्या प्रशासकीय कारणास्तव मध्यावधी बदल्या/प्रतिनियुक्तीने पदस्थापना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सदर पदावरील अधिकाऱ्यांच्या बदल्या प्रतिनियुक्तीने पदस्थापना याबाबत पुढीलप्रमाणे शासन आदेश देण्यात येत आहेत :-

शासन निर्णय :-

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (४) (दोन) व कलम ४ (५) मधील तरतुदींनुसार तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील परिशिष्ट-तीन, नियम ४० (१) (२) (३) (४) व परिशिष्ट-दोन मधील अटी व शर्तीनुसार व प्रशासकीय कारणास्तव खालील विवरणपत्रात दर्शविण्यात आल्यानुसार संचालक, नगररचना व मुल्य निर्धारण विभागाच्या आस्थापनेवरील सहाय्यक संचालक, नगर रचना संवर्गातील अधिकाऱ्यांच्या मध्यावधी बदल्या करुन बदली/ प्रतिनियुक्तीने पदस्थापना करण्यात येत आहे.

अ. क्र.	अधिकाऱ्याचे नांव	सध्याचे कार्यालय	बदली/प्रतिनियुक्ती नंतरचे कार्यालय
१.	श्री. म.य.भार्गवे, सहाय्यक संचालक, नगर रचना	सहाय्यक संचालक, नगर रचना, मिरा भाईंदर महानगरपालिका (प्र.नि.)	सहाय्यक संचालक, नगर रचना, नाशिक महानगरपालिका (शा.आ.)

०३. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी वरील अधिकाऱ्यांना बदलीने/प्रतिनियुक्तीने पदस्थापना करण्यात आलेल्या ठिकाणी रुजू होण्याकरिता आवश्यक ते कार्यकारी आदेश तातडीने निर्गमित करण्याची कार्यवाही करावी.

०४. या आदेशान्वये प्रतिनियुक्तीने पदस्थापना करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांनी संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे बदली/प्रतिनियुक्तीबाबतचे कार्यकारी आदेश प्राप्त होताच बदली/प्रतिनियुक्तीच्या ठिकाणी तातडीने रुजू व्हावे.

०५. उपरोक्त अधिकाऱ्यांची सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने बदली/प्रतिनियुक्तीने पदस्थापना करण्यात येत असल्याने त्या अधिकाऱ्यांना नियमानुसार अनुज्ञेय पदग्रहण अवधी व संयुक्त बदली अनुदान मंजूर करण्यात यावे.

०६. सदरहू आदेशान्वये बदली/प्रतिनियुक्तीने पदस्थापना करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांनी नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झाल्यास वा राजकीय दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न केल्यास त्याची संबंधित अधिकाऱ्यांच्या गोपनीय अहवालात नोंद घेण्यात येईल. तसेच राजकीय दबावाबाबतची कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम ३ (३) व २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे ती गैरवर्तणूक समजून संबंधितांविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.

०७. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी, सदर बदली/प्रतिनियुतीच्या अनुषंगाने रिक्त होणाऱ्या पदाचा अतिरिक्त कार्यभार त्याच अथवा नजिकच्या कार्यालयातील समकक्ष दर्जाच्या अधिकाऱ्यांकडे अथवा बदली होणाऱ्या

अधिकाऱ्याच्या संवर्गास कनिष्ठ असलेल्या संवर्गामधील त्याच कार्यालयातील ज्येष्ठ अधिकाऱ्याकडे सोपविण्यात यावा. परंतु, कोणत्याही परिस्थितीत बदली होणाऱ्या अधिकाऱ्याकडे त्याच्या बदलीमुळे रिक्त होणाऱ्या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविला जाणार नाही, याची दक्षता घ्यावी.

०८. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०१९०८१३१२५५४०००२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Vishnu Shripati Patil

Digitally signed by Vishnu Shripati Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=21ebe4508a75a767041512feeaa6b8f2d5bc8caf857fe02cd29ce4bbb772da09, serialNumber=f8a0fc598f692587efafe9bd62df9e449fdf81c803c27adf1782c97c76ebcba5, cn=Vishnu Shripati Patil
Date: 2019.08.16 15:41:57 +05'30'

(विष्णू पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

संबंधित अधिकारी यांना ,
(संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत.)

प्रत :-

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
३. महालेखापाल (लेखा परिक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
४. महालेखापाल (लेखा परिक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
५. मा. मुख्य मंत्र्याचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. विभागीय आयुक्त कोकण विभाग नवी मुंबई/अमरावती/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/पुणे.
११. आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक.
१२. आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका, मिरा-भाईंदर
१३. जिल्हाधिकारी, ठाणे/नाशिक
१४. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१. (३-प्रती)
१५. सर्व सह संचालक, नगर रचना------------------------.
१६. सर्व उपसंचालक, नगररचना ----------------- .
१७. उपसचिव तथा उपसंचालक नगर रचना (न.वि.९) नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई
१८. उप सचिव (नवि-३/२७), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९. सर्व सहाय्यक संचालक, नगररचना/नगर रचनाकार, शाखा/मुल्यांकन कार्यालये.
२०. निवड नस्ती